MAHADISCOM

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

वाणिज्य विभाग, प्रकाशगड- ५वा मजला, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व),
मुंबई.४०००५१. फोन: (वै)२६४७४७५३ (का)२६४७४२११; फॅक्स २६४७२३६६

---

**क्र. पीआर-जनरल/१०१७०** **दिनांक : २७.०४.२००६**

## परिपत्रक क्र. ३६

**विषय:** मा.उच्च न्यायालयाच्या अवमान प्रकरणात वैयक्तिक उपस्थितीबाबतच्या आदेशांचे पालन काटेकोर करणेबाबत.

**संदर्भ:** महाराष्ट्र शासनाचे परिपत्र क्र. २११/ई, विधि व न्याय विभाग, दिनांक ३१ मार्च,२००६.

--------------

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या परिपत्रकात शासनाने असे नमुद केले आहे कि, मा. उच्च न्यायालयाने एका अवमान याचिकेच्या सुनावणी प्रकरणी महाराष्ट्र शासनाच्या अधिकाऱ्यांच्या सुनावणीला अनुपस्थित राहण्याच्या वाढत्या प्रवृत्तीबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. न्यायालयाने असे नमूद केले की, ज्या व्यक्तींच्या नावे अवमान याचिकेमध्ये उपस्थित राहण्याबद्दल नोटीस निर्गमित केलेली असते त्या प्रकरणी ते अधिकारी वैयक्तिक रित्या उपस्थित रहात नाहीत.

सदर आदेशास अनुलक्षून ज्यांच्या नावे अवमान नोटीस निर्गमित करण्यात आली आहे अशा सर्वांना निर्देश देण्यात येत आहे की, मा. न्यायालयाने कोणत्याही अवमान याचिके संदर्भात ज्या अधिकाऱ्यांच्या नावे नोटिस निर्गमित केली आहे अशा अधिकाऱ्यांनी नोटीशीमध्ये स्पष्टपणे नमूद केले असल्यास, निर्देशित केलेल्या दिवशी वैयक्तिक रित्या उपस्थित रहावे.

तरी या परिपत्रकान्वये सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना कळविण्यात येते कि, सदर आदेशाचे काटेकोर पालन करण्यात यावे.

सहपत्र: वरीलप्रमाणे.

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

प्रति,
मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्यादित सर्व परिमंडळे
अधिक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्यादित सर्व मंडळे
कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्यादित सर्व विभागीय कार्यालये
उपकार्यकारी अभियंता/सहाय्यक अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्यादित सर्व उपविभागीय कार्यालये

Created by Neevia Personal Converter trial version http://www.neevia.com